# पाठ : ८

# 'माणदेशी माणसं' – परिचय २


८.० उद्दिष्टे
८.१ प्रास्ताविक
८.२ कथानक परिचय
  ८.२.१ कोंडिबा गायकवाड
  ८.२.२ शिवा चांभार
  ८.२.३ शिवा माळी
  ८.२.४ तांबोळ्याची खाला
  ८.२.५ रघू कारकून
८.३ समारोप
८.४ सारांश
  आपली प्रगती तपासा : उत्तरे


## ८.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, मागील पाठात आपण 'माणदेशी माणसं' या व्यक्तिचित्रात्मक कथांच्या पुस्तकातील काही व्यक्तिचित्रांचा अभ्यास केला. व्यक्तिचित्रे म्हणजे काय – तेही समजून घेतले. आता या पाठात 'माणदेशी माणसं' या कथा संग्रहातील आणखी काही कथांची कथानके अभ्यासणार आहोत. मूळ व्यक्तिचित्रांच्या वाचनाबरोबर हा पाठ अभ्यासल्यावर तुम्हाला

- कोंडिबा गायकवाड, शिवा चांभार, शिदा माळी, तांबोळ्याची खाला, रघू कारकून या कथांची कथानके लिहिता येतील.
- या कथांमधील प्रमुख पात्रांचे स्वभाव रेखाटन करता येईल.

## ८.१ प्रास्ताविक

आपण पाहिले की व्यंकटेश माडगूळकरांचे लहानपण माणदेशच्या परिसरात गेले. या परिसरात संस्कारक्षम वयात त्यांना जी माणसे भेटली, जे जीवन जवळून पहायला मिळाले

ते त्यांनी 'माणदेशी माणसं' मधून अतिशय जिव्हाळ्याने रंगवले आहे. याच दिवसांवर आधारित 'कोवळे दिवस' नावाचे एक पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. तेही तुम्ही जरूर वाचा. 'माणदेश'च्या परिसरातील आणखी काही कथांची कथानके पुढे दिली आहेत.

## ८.२ कथानक परिचय

### ८.२.१ कोंडिबा गायकवाड

माणदेशातला कोंडिबा गायकवाड बलदंड, उरफाट्या काळजाचा, असंस्कृत आणि रांगडा आहे. गळ्यात पेटी, रुंद छातीवर केसांचे जाळे, पिंढऱ्यांचे गोळेही वरवंट्यासारखे कठीण असा कोंडिबा थोराड आणि काहीसा उग्र आहे. तो वाटेकरी असल्याने त्याच्याकडे खंड मागायला जेव्हा लेखक जातो तेव्हा त्याच्याशी कोंडिबा अतिशय उर्मटपणे बोलतो. मऊपणा त्याच्या अंगात नाही. लेखकाचा मळा त्याने खंडाने करायला घेतला ज्यावर त्याची चांगली गुजराण होत असते. संतू नावाच्या त्याच्या मोठ्या भावाशी त्याचे वैर असते. संतूने कोंडिबाच्या जमिनीच्या बांधाला असलेली दुसऱ्याची जमीन खंडाने करायला घेतल्याने त्या दोघांत सतत भांडणे होत असतात. कोंडिबाची गुरे एक दिवस त्याच्या भावाच्या (संतूच्या) रानात शिरल्यामुळे दोघांत बाचाबाची होते. संतू, त्याची दोन पोरे कोंडिबाच्या अंगावर धावून जातात. त्याच्यावर काठ्या उगारतात. डोक्यावर काठ्या पडू नयेत म्हणून त्या हाताने आडवतो व हातावर काठ्या पडल्याने त्यांचा हात सुजतो. त्याचे कोंडिबाला फारसे काही वाटत नाही. एक फडके तो हाताला गुंडाळून ठेवतो आणि आपले रोजचे काम नेमाने करीत राहतो. दोघा भावांतली तेढ कुणा एकाचा मुडदा पाडल्याशिवाय संपायची नाही असे कोंडिबाचे स्पष्ट मत असते. स्वत:ची म्हैस स्वत:च्या हाताने रागाच्या भरात मारून टाकणारा कोंडिबा अत्यंत क्रूर आणि रानटी वाटतो. म्हैस एकदा धार देईना म्हणून कोंडिबा तिला बेदम मारतो आणि ती एकदम ओरडून गरागरा फिरून धाडकन खाली पडते व प्राणच सोडते. ही सगळी कथा कोंडिबा सहजगत्या सांगतो. त्याच्या तोंडावर दिलगिरी दिसत नाही की स्वरात हळहळ जाणवत नाही.

खंड मागण्यासाठी आलेल्या लेखकाला सध्या पैसे नाहीत असे कोंडिबा शांतपणे सांगतो. पुन्हा पैशाचा आग्रह होताच 'पठाणी कायदा आहे का? असेल तर तो कोंडिबापुढे चालायचा नाही' असे गुर्मीत म्हणतो. डोक्यात धोंडा घातला तरी पैसे मिळणार नाहीत कारण पैसेच नाहीत असे ठासून सांगितल्यावर लेखक पैसे न घेताच निघून जातो. दरवर्षी चार–सहा हेलपाटे घातल्याशिवाय कोंडिबा पैसे देत नाही आणि त्याबद्दल त्याला जराही शरमल्यासारखे वाटत नाही.

एकदा त्याच्या रानातून एका महाराने त्याला न विचारता कणसे नेली असता त्यालाही कोंडिबा गुरासारखा मारतो. मारून त्याची पाठ काळी–निळी करतो. महार तडक फौजदाराकडे जातो. पण कोंडिबा फौजदाराला पैसे देतो आणि सुटतो. महाराला न्याय मिळत नाही. स्वत:च्या भावालाही कोंडिबा डोक्यात धोंडा घालून मारतो. तालुक्याच्या कचेरीत

जाऊन 'मी भावाला मारतो' असे सरळ सांगून जी शिक्षा होते ती मान्य करतो. बायको जेव्हा रडू लागते तेव्हा कोंडिबा डाफरतो की, 'रडायला काय झाले आहे? यावर्षी पीक चांगले आले आहे. काळजीचे काय कारण?' असा कोंडिबा काळीज नसलेल्या माणसासारखा वागतो.

### ८.२.२ शिदा चांभार

जातीने चांभार असलेला शिवा महा बेरकी असतो. तो उंचीने बुटका पण हाडापेराने चांगला बळकट असतो. रंगाने काळाभोर. त्याच्या तोंडावरूनच तो मोठा धूर्त आणि लुच्चा असावा, असे वाटते. परिस्थितीने शिदा गरीब पण वृत्तीने माजोरी असतो.

डोक्यावर कसंबसं गुंडाळलेलं मुंडासं, अंगात मळकट सदरा, त्याच्यावर निळा ढगळ लोकरी कोट–तोही जागजागी पांढऱ्या दोऱ्याने रफू केलेला. तांबड्या काठाचे धोतर मात्र देशमुखासारखं तो झोकात नेसतो. एखादा नवा–जुना चप्पल जोड हातात घेऊन घाईने जाताना तो नेहमी दिसतो.

स्वत:च्या वहाणा फाटलेल्या असतात, म्हणून कथेचा निवेदक त्याला बोलावतो. त्या फाटक्या वहाणा मेलेल्या उंदरासारख्या धरून शिदा अतिशय उपहासाने हसतो. आणि त्या दुरुस्ती करण्यालायक नाहीत असे सांगतो. निवेदकाला त्याच्या आगाऊपणाचा राग येतो. तरी तो राग वर न दाखवता निवेदक त्याला नवी पायताणं तयार करायला सांगतो. दोन रुपये विसार म्हणून घेऊन व जुनी वहाण दुरुस्तीसाठी उचलून शिदा पसार होतो. तासाभरात दुरूस्त करून देतो सांगून चांगला संध्याकाळी उगवतो. त्या बदल्यात निवेदकाचा जुना कपडा हक्कानं मागून नेतो. एक दिवसात नवे पायताण बांधून आणतो म्हणून जातो ते तीन दिवस झाले, तरी फिरकत नाही. वैतागून, चरफडत शेवटी निवेदकच त्याच्या घराकडे जातो. तेव्हा शिदा तुटक्या पायताणांच्या पसाऱ्यात बसलेला असतो.

निवेदक तणतणत, चिडून त्याला म्हणतो, ''दुसऱ्या दिवशी आणून देतो म्हणून सांगितलंस गृहस्था आणि आज आठ–दहा दिवस उलटून गेले तरी तुझा पत्ता नाही!'' यावर थंडपणे शिदा म्हणतो, ''चालायचंच वकुत लागायचाच.'' निवेदक जितका रागावलेला तितका शिदा थंड असे ते दृश्य असते. त्यानंतर शिवा नवा पायताणांचा जोड घेऊन येतो. निवेदक त्याला 'तळात माती नाही ना घातलीस?' म्हणून विचारतो. त्यावर शहाजोगपणे शिदा म्हणतो, ''असा लबाडपणा आपल्या बाच्यानं होणार नाही. पोटाला लागलं तर मागून घेईन चार–आठ आनं पण कामात कुचराई!'' यावर निवेदक त्याचे पैसे चुकते करतो. मात्र दोन अडीच महिन्यांतच शिदानं बनवलेल्या वहाणांना भोक पडून त्यातून दोन थरांमधली माती ढासळू लागते. निवेदकाचा अंदाज खरा निघतो. तो शिदाला गाठून माती घातल्याबद्दल बोलतो तेव्हा शिदा म्हणतो, ''माती हाय व्हय जी? कराल हायजी!'' (कराल म्हणजे मुरूम) आणि वर पोटासाठी लबाडी करावी लागते– काय करणार– असंही म्हणतो. निवेदक डोक्याला हात लावण्यापलीकडे काही करू शकत नाही.

गांधीवधानंतर गावात जी जाळपोळ होते त्यात निवेदकाचे घरही जाळले जाते. त्या जाळपोळीत शिदा आघाडीवर असतो. पळवून आणलेल्या वस्तूंची चैन करतो. थोड्याच

दिवसांत शिपाई चौकशी सुरू करतात. तेव्हा सगळी भांडीकुंडी आडात टाकून देतो. उरलेली भांडी आणि इतर वस्तू पाहून गावकरी चिडतात. त्यावर शिदा म्हणतो, 'काय बिघडलं आणली म्हणून' आपला हक्कच असल्याप्रमाणे तो वागतो.

खेडेगावात दारिद्र्यात राहाणारी सर्वच माणसे काही गरीब, दीन नसतात. त्यात शिवा सारखा एखादा लबाड, स्वार्थी, बेरकीही असतो हे ही कथा सुचवते.

### ८.२.३ शिवा माळी

शिवा हा प्रायमरी शाळेचा गडी. घंटा देणे, झाडलोट करणे, शाळेपुढच्या बागेची निगा राखणे अशी सगळी कामे तो चोखपणे बजावीत असतो. शिवा आपल्या सच्च्या वागणुकीने सगळ्या मास्तर लोकांची मर्जी सांभाळून असतो. मास्तरांच्या घरची छोटी कामेही तो अडचणीला करीत असतो. स्वत:चे पैसे खर्च करून कपडे घेण्याची त्याला गरज पडत नसे कारण मास्तरांकडून कोट, धोतर, त्याला मिळत असे.

शिवा अडाणी असला तरी सरावाने घंटा देण्याची वेळ त्याला हळूहळू कळू लागते आणि आकडेही उमगू लागतात. गावात त्याचे घर नव्हते आणि रानही. म्हणून माळ्याच्या जातीत जन्माला येऊनही शेती न करता शिवा सरकारी नोकरी करून प्रपंच चालवीत असतो. त्याची बायको रानात रोजगाराने कामाला जाई आणि पोरगे शाळेत येई किंवा गावात हिंडत बसे. नोकरीबरोबर संसारही प्रामाणिकपणे करणारा शिवा एक दिवस पोलिसांकडून चोरीच्या गुन्ह्यासाठी पकडला जातो. सगळ्या गावालाच आश्चर्य वाटते. महादू सोनार आणि शिवा अशा दोघांना पोलीस पकडून नेतात.

शिवा शिक्षा भोगून परत गावात येतो, तेव्हा त्याची बायको मुलाला घेऊन माहेरी निघून जाते. चोरी करणाऱ्या नवऱ्याबरोबर मला संसार करायचा नाही असे तिचे म्हणणे असते. शिवा मुळात अतिशय प्रामाणिक असतो. महादू सोनाराच्या संगतीत हळूहळू त्याला वेगवेगळे नाद लागतात. खूप पैसे कमवावे असे वाटू लागते. बायको दाग–दागिन्यांसाठी सतत कुरकुरत असते आणि महागाईच्या दिवसात दोघांच्या कमाईवर संसार कसबसा सुरू असतो. शिवा रोजच्या कटकटींना कंटाळतो. महादूबरोबर चोरी करायला तयार होतो. घरफोडीचे सांगितल्यावर शिवा सुरुवातीला नाही म्हणतो. कुलूप तोडून ऐवज पळवायचे काम महादूचे आणि बाहेर उभे राहून कोणी येत आहे का हे पाळत ठेवण्याचे काम शिवाचे असे ठरते आणि मग शिवा त्याला तयार होतो. पैशाची त्याला भूल पडते. महादू त्याला फसवतो. तिन्ही घरफोडीत हजारावर रुपये मिळूनही बेचाळीस रूपये मिळाल्याचे सांगून शिवाला निम्मे म्हणजेच साडे एकवीस रुपये मिळतात. महादू महिन्याभरात पकडला जातो. तसा शिवा घाबरतो. त्याच्या काळजाचे पाणी–पाणी होते.

जे घडले ते लेखकाला प्रामाणिकपणे सांगून शिवा माणदेशातून निघून जातो. एकदा अब्रू गेली आता विष खाऊन मरावे किंवा माणदेशातून निघून जावे एवढे दोनच पर्याय शिवाजवळ असतात. त्यातला दुसरा पर्याय तो निवडतो. शिवाच्या रूपाने मुळात साधा, प्रामाणिक, पापभीरू असणाऱ्या माणसाला एखाद्या चुकीमुळे आयुष्यातून उठावे लागते, याचे

सुन्न करणारे वास्तव समोर येते.

### ८.२.४ तांबोळ्याची खाला

इंग्रजी चौथीला असताना अभ्यासासाठी म्हणून निवेदक गावातच एका वाड्यातील खोली घेऊन मित्राबरोबर तिथे रहात असे. त्यांच्या पलीकडच्या खोलीतच खाला नावाची तांबोळीण राहात असे. तिच्या नवऱ्याचा चांगला व्यापार होता. पण पैसे मिळायला लागल्यावर तो बदलला. रोज खालाला मारू लागला. घरात एक बाई आणून ठेवली. जोवर शक्य तोवर खालाने सोसले. मग एक दिवस तिने भल्या पहाटे घर सोडले. चार पैसे बाजूला साठवून कुंकू दातवण्याचा व्यापार सुरू केला. कधीतरी नवरा मेल्याची बातमी कानावर आल्यावर ती विधवा म्हणून राहू लागली. तिचा जगण्याचा हव्यास सुटला नाही. ती कष्ट करून धडपडत होती, चार पैसे कमवत होती.

ती रंगाने काळी–सावळी, उंचीने ठेंगणी आणि अंगाने भरलेली अशी जहांबाज म्हातारी होती. जातीने मुसलमान असली तरी तिच्या साडी–चोळीवरून व ती नेसायच्या पद्धतीवरून ती मुसलमान आहे, असे वाटत नसे. कानात कुड्या, हातात मोहरेची अंगठी घालून, पदर डोक्यावरून घेऊन ती दणादणा चालत असे.

एखाद्या मधमाशीसारखी ती कष्टाळू होती. सतत काहीतरी उद्योग करीत असायची. घरीच ती दातवण बनवे. आठवड्याच्या बाजारात हळद–कुंकू, बुक्का, दातवण, शेंगदाणे, फुटाणे, चुरमुरे असे जिन्नस विकत असे. टोपली डोक्यावर घेऊन खेडोपाडी ती ते विकी. खेड्यात दुकाने नसल्याने तिला चार एक रुपये मिळत. पंढरीच्या वारीला ती दातवण घेऊन विके त्याकाळात तिची फिरती तात्पुरती बंद असे. नागपंचमीला ती लोकांना लाह्या भाजून देई. निवेदक आणि त्याचा मित्र खालाकडून कधीकधी शेंगदाणे विकत घेत. मुलांच्या खोलीतली उखडलेली जमीन दिसल्यावर खाला ती शेणाने सारवून चकपक करून देई. त्यामुळे मुलांच्या मनात तिच्याविषयी आपलेपणाचा पाझर फुटला आणि ती तिच्याशी शेजारधर्माने वागू लागली.

रात्रीची बासरी वाजवू नये, बोडक्या बाईने बासरी ऐकू नये, उंबऱ्यावर बसू नये असे अनेक हिंदू संकेत, चालीरीती तिला माहीत होत्या. ती स्वत:ही त्या चालीरीती पाळे व या मुलांनाही त्या पाळण्याचा आग्रह करी.

गोडीगुलाबीने राहावे, चार माणसे जोडावी, भलेपणा मिळवावा, असे तिचे जगण्याचे तत्त्वज्ञान होते. याच तत्त्वाने ती जगते. वय झाले तरी डोक्यावरचे 'टोपलीतले दुकान' घेऊन पाय ओढत चालत राहते. साध्यासुध्या बाईतही असणारी जगण्याची तीव्र इच्छा, विजीगिषु वृत्ती, चिवटपणा तिच्यात दिसतो.

(माडगूळकरांच्या या व्यक्तिचित्रात्मक कथांतील ही एकच स्त्री व्यक्तिरेखा आहे. पण ती अत्यंत प्रभावी आहे.)

### ८.२.५ रघू कारकून

रघू मवाळ आणि अतिशय कष्टाळू आहे. त्याचे घराणे कुलकर्ण्याचे आणि वडील कर्तबगार

माणूस होते. ते रघूच्या लहानपणीच वारले. पाठोपाठ आईसुद्धा वारली. रघूला मोठा भाऊसुद्धा होता. त्याच्याकडे वडिलांनंतर कुलकर्ण्याचे काम आले. पण त्याने फारसे काही कमावले तर नाहीच उलट होते तेही गमावले. घरात अठराविश्व दारिद्र्य आले. रघू शिकत असताना त्याला थोरल्या भावाचा कोट–सदरा घालायला मिळे. वापरून टाकलेला सदरा रघू निमूटपणे वापरे. भावाची बायको रघूचा पदोपदी अपमान करी, त्याला टाकून बोली. म्हणजे रघू तिला गळ्यातील धोंड वाटे. सातवीपर्यंत रघू कष्ट करून स्वत: चार दोन पैसे कमवून शिकला. थोरामोठ्यांच्या हातापाया पडून एका मामलेदार कचेरीत बारा रुपये पगारावर चिकटला. तालुक्याच्या गावी जाऊन राहू लागला. भावाचा प्रपंच खेड्यात चालेना म्हणून तो  सोलापूरला गेला व रघूला त्याने जाताना साधे विचारलेही नाही.

कासारगल्लीतील एका मोडकळीला आलेल्या घरात रघू राहू लागला. तेथे भूत आहे, असा समज असल्याने मालकाने रघूला ते फुकटात दिले होते. जरूरी पुरती दोन–चार भांडी रघूने घेतली. रोज सकाळी उठून शेजाऱ्याच्या आडावर जाऊन चार तांबे पाणी अंगावर ओतून आंघोळ करायची, पाण्याची घागर भरून आणायची, चहा करून प्यायचा आणि कचेरीत जायचे असा त्याचा ठरलेला सकाळचा दिनक्रम होता. दुपारी घरी येऊन चार भाकरी–कालवण करुन खावे आणि थोडा वेळ डुलकी घ्यावी किंवा घर झाडून घ्यावे असे तो ठरवून घरी येत असे. कचेरीची वेळ झाली की परत पाच वाजेपर्यंत खर्डेघाशी करत असे. संध्याकाळी कधी वाण्याच्या दुकानात तर कधी बाजारपेठेत चक्कर मारून रघू वेळ घालवत असे आणि अंधारल्यावर परत येऊन चार घास खाऊन सूताड्यावर पडून राही. अनेक वर्षे त्याचा हाच दिनक्रम होता. घरात सोबतीला कोणी नाही, रघू एकटा होता. भूतासारखा त्या घरात एकटाच भिंतीकडे बघून जगत होता.

मग हळूहळू त्याच्या दिनक्रमात बदल झाला. तो उशिरा उठू लागला, धावपळ करून कशीतरी अंघोळ आटपून कचेरीत जाऊ लागला. चूल पेटवून भाकऱ्या न भाजता शेंगदाणे खाऊ लागला. त्याच्या घरात त्याच्यापेक्षा लहान असलेली टपोरी पोरं बिड्या ओढायला येऊ लागली. वेळी–अवेळी चूल पेटवून चहा प्यायला लागली. रघूचा पूर्वीचा दिनक्रम बिघडला. लग्नासाठी त्याने पैसे साठवायचे ठरवले त्यामुळे तो पोट मारू लागला. कळकट विटके कपडे, चेहऱ्यावर दैन्य–लाचारी आणि असहायता अशी अजून काही वर्षे गेली. रघूचे लग्नाचे वयही निघून गेले. आपल्या लग्नाचे बघायला कोणी मोठे माणूस नाही, आपण गरीब आहोत, या विचाराने रघू अस्वस्थ होई.

भावाच्या कानापर्यंत ही बातमी जाताच भावाने शेवटी रघूच्या लग्नाचे मनावर घेतले. मुलगी ठरली व अनेक विघ्ने येऊन शेवटी रघूचे लग्न झाले. रघू बायकोला घेऊन गावी आला व नोकरीवर रुजू झाला. त्याने घर बदलले. त्याचा दिसण्यात, पोषाखात बदल झाला. व रघू एकदा माणसात आला.

महागाईच्या काळात रघूचा संसार सुरू झाला. बायकोची बाळंतपणं, दुखणी, दोन पोरांची भर साऱ्याने रघू टेकीला आला. आर्थिक चणचणीने चिंताग्रस्त झाला. लोकांकडून पैसे उधार घेऊ लागला आणि देणेकऱ्यांना चुकवू लागला. त्याची बायकोही खचली. रोजचे वाद–

भांडणे, पोरांचे गोंधळ-रडारड याने रघू वैतागून जाई. कचेरीतून घरी आल्यावर त्याला वेळेच्या वेळी जेवण मिळेनासे झाले. रघूने साऱ्याला वैतागून एके रात्री अफू खाल्ली. आपण मरणार या विचाराने तो खूप घाबरला. डॉक्टरांना बोलावून आणल्यावर त्यांच्या पाया पडून 'वाचवा' असे म्हणू लागला. लहान मुलासारखा रडू लागला.

सगळ्यांना वाटले रघूने गरिबीला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण कारण वेगळेच होते. रघूच्या बायकोचे दुसऱ्या माणसाशी सूत जमले होते. एके दिवशी रघूला असे काही आढळले की त्याला मरावेसे वाटले. गरिबी माणसातले माणूसपण कसे मारून टाकते याचे अस्वस्थ करणारे चित्र रघूच्या रूपाने दिसते.

**८.२ आपली प्रगती तपासा .**

**गाळलेल्या जागा भरा.**

१) निवेदक कोंडिबाकडे ..... मागायला जातो.

२) कोंडिबा ..... चा दगड डोक्यात घालून खून करतो.

३) शिदा चांभार स्वभावाने ..... असतो.

४) परिस्थितीने शिदा गरीब असला तरी वृत्तीने ..... असतो.

५) शिदा निवेदकाच्या फाटक्या वहाणा ...... धरतो.

६) शिदा वहाणेच्या तळात ..... भरतो.

७) शिवाची वागणूक ..... असते.

८) शिवाच्या ...... च्या नादाने चोरी करायला प्रवृत्त होतो.

९) खाला धर्माने ..... असते.

१०) खाला ..... अशी बोलत असे.

## ८.३ समारोप

विद्यार्थी मित्रांनो, ही कथानके अभ्यासताना तुमच्या लक्षात आले असेल की माडगूळकरांनी एकेका व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून त्याची जीवनकहाणी अगदी नेमकेपणे सांगितली आहे. ती अतिशय परिणामकारक झाली आहे. आता उर्वरित कथांची कथानके आपण पुढील पाठात अभ्यासणार आहोत.

## ८.४ सारांश

प्रस्तुत पाठात आपण कोंडिबा गायकवाड, शिदा चांभार, शिवा माळी, तांबोळ्याची खाला आणि रघू कारकून या कथांची कथानके अभ्यासली. या प्रत्येक कथेत एकेका माणदेशी माणसाच्या जीवनाचे दर्शन लेखकाने घडवले आहे.

पुढील तक्त्यावरून एका दृष्टिक्षेपात तुम्हाला व्यक्तिरेखेचे दर्शन घडू शकेल.

| **कथेचे नाव** | **व्यक्तिरेखा** | **वैशिष्ट्ये** |
|---|---|---|
| **कोंडिबा गायकवाड** | कोंडिबा गायकवाड | बलंदड, उफराट्या काळजाचा. निवेदकाचा खंडकरी. धार देईना म्हणून म्हशीचा जीव घेणारा, भावाशी पटत नाही म्हणून त्याचा खून करणारा. |
| **शिदा चांभार** | शिदा चांभार | चांभार जातीचा. बेरकी आणि लुच्चा. निवेदकाच्या वहाणात कराल भरून त्याला फसवतो. गांधी हत्येनंतर जाळपोळीत गावातील लोकांच्या वस्तू, धान्य चोरून स्वत:चे घर भरतो. |
| **शिवा माळी** | शिवा माळी | शाळेत गडी म्हणून सचोपणाने काम करणारा सरळ, साधा माणूस. महादू सोनाराच्या संगतीने चोरी करायला प्रवृत्त होतो. त्यात पकडला जातो आणि त्याला तुरुंगवास घडतो. याने पार खचून जातो. |
| **तांबोळ्याची खाला** | खाला | विधवा–मुसलमानीण. काळी–सावळी, ठेंगणी, जहांबाज म्हातारी. निवेदक व त्याचा मित्र यांच्यावर माया करणारी, कुंकू, दातवणाचा व्यवसाय, गावोगाव फिरून करणारी, चार माणसे जोडून भलेपणा मिळवणारी. |
| **रघू कारकून** | रघू, | मवाळ आणि कष्टाळू अनाथ. भावाने वाऱ्यावर सोडले, मामलेदार कचेरीत कारकून, दरिद्री. बायको दुसऱ्याच्या नादी लागली म्हणून जीव देण्याचा प्रयत्न. |

## आपली प्रगती तपासा – उत्तरे

८.२

१) खंड　　२) सख्ख्या भावाचा, संतूचा　　३) महा बेरकी

४) माजोरी　　५) मेलेल्या उंदरासारख्या　　६) कराल

७) सच्ची　　८) महादू सोनाराच्या　　९) मुसलमान

१०) लाह्या फुटाण्यात

***

## अधिक टिपणासाठी